रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळावरील अशासकीय
सदस्यांच्या नियुक्तीबाबतची कार्यपध्दत निश्चित करणे.

**महाराष्ट्र शासन**
**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : एसपीबी-२०२२/प्र.क्र.४४/सां.का.१**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १३ ऑक्टोबर, २०२२

**वाचा** : १) गृह विभाग, अधिसूचना क्र.४७१३/थिएटर ब्रँच/१९७४, दि.०५.०१.१९५४
२) गृह विभाग, शासन निर्णय क्र. २७०१/५/POLL, दिनाक १९/०७/१९५४
३) शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,क्रमांक एसपीबी २०१२/प्र.क्र१३१/सां.का.१ दि.२७.११.२०१३.
४) सचिव, रंगभूमी प्रयोग परिनिरिक्षण मंडळ यांचे पत्र क्र.रंप्रपमं/सां.का./२०२२/३४१५. दि.०६/०६/२०२२.

**प्रस्तावना :**

सार्वजनिक ठिकाणी सादर होणाऱ्या मनोरंजनाच्या कार्यक्रमांच्या संहितांचे पूर्व परिक्षण करण्यासाठी पोलीस अधिनियम १९५१ मधील कलम ३३ (१) (wa) (iii) नुसार तमाशा, मेळा व रास इत्यादी मनोरंजनाच्या कार्यक्रमांच्या संहिताचे पूर्व परिक्षण करुन, सदर कार्यक्रमांना योग्यता प्रमाणपत्र (Suitability Certificate) देण्यासाठी गृह विभागाच्या दि.०५.०१.१९५४ च्या अधिसूचनेद्वारे रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाची स्थापना करण्यात आली आहे. मंडळाकडे प्राप्त संहितांचे पूर्व परिक्षण रंगभूमी मंडळातील साहित्य, कला क्षेत्रातील अनुभवी / तज्ञ मान्यवरांकडून केल्यानंतर योग्यता प्रमाणपत्र देण्यात येते. याबाबतची संपूर्ण कार्यवाही सार्वजनिक मनोरंजनाच्या जागा (सिनेमाव्यतिरिक्त) आणि मेळे व तमाशे धरुन, सार्वजनिक मनोरंजनाचे प्रयोग यांना अनुज्ञप्ती देणे व त्यावर नियंत्रण ठेवणे (९ वी सुधारणा) नियम १९६० तसेच सुधारित नियम १९७४ मधील नियम १३७ ते १४५-अनुसार करण्यात येते.

२. सार्वजनिक मनोरंजनाच्या जसे नाटक, तमाशा, मेळा इत्यादी कार्यक्रमांमुळे भारताचे सार्वभौमत्व आणि एकात्मता किंवा राज्याची सुरक्षितता, परकीय राष्ट्राची किंवा कोणत्याही समाजाची किंवा कोणत्याही धर्माच्या अनुयायांची भावना न दुखावणे, सभ्यता किंवा नितिमत्ता यांना बाधा येऊ नये, न्यायालयाचा अवमान होऊ नये, कोणत्याही श्रेष्ठ व्यक्तीची किंवा साहित्यिक, सामाजिक, सांस्कृतिक किंवा राजकीय क्षेत्रातल्या सुप्रसिध्द अशा कोणत्याही व्यक्तीची बदनामी होऊ नये तसेच सार्वजनिक सुव्यवस्था व कायदा याची दक्षता घेण्यासाठी कार्यक्रमांच्या लिखाणाच्या संहितांचे पूर्वपरिक्षण

करण्यासाठी रंगभूमी मंडळाची निर्मिती करण्यात आलेली आहे. सदर मनोरंजनाच्या कार्यक्रमांच्या संहिता (script) नसल्यास कार्यक्रमांचे निश्चित केलेले निवेदन/ सारांशाचे (Synopsis) पूर्वपरिक्षण मंडळाच्या अशासकीय सदस्यांकडून केले जाते.

३. सदर मंडळावरील अध्यक्ष व सदस्यांची निवड विविध स्तरातून प्राप्त शिफारशीनुसार मा.मंत्री महोदयांचे मान्यतेने करण्यात येते. सदर मंडळ तीन वर्षासाठी कार्यरत असते व त्यानंतर मंडळाची पुनर्रचना करण्यात येते.

४. सद्यस्थितीत मंडळावर अध्यक्ष व अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्यासंदर्भात कार्यपध्दतीबाबत स्पष्टता नसल्याने अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्यासाठी कार्यपध्दत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

या शासन निर्णयान्वये रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळावर अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यपध्दत निश्चित करण्यात येत आहे:-

**(१) अर्हता :-**

रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळावर अध्यक्ष व अशासकीय सदस्य या पदावर नियुक्तीसाठी रंगभूमीशी संबंधित नाटय लेखन, नाटय व्यवस्थापन, नाटय निर्मिती, नाटय कलाकार, कोणत्याही विद्यापीठातील मराठी नाटयशास्त्र विषयाशी संबंधित प्राध्यापक, नाटय परिक्षक, साहित्यिक, तसेच प्रतिष्ठीत नाटय आणि एकांकिका स्पर्धामध्ये तसेच रंगभूमीशी संबंधित महोत्सवामध्ये अविष्कार सिध्द केलेल्या व्यक्ती (कलाकार/ तंत्रज्ञ) इत्यादी क्षेत्रातील अनुभव असावा.

अ) अध्यक्ष पदासाठी - किमान २० वर्षाचा अनुभव असावा.

ब) सदस्य पदासाठी - किमान १५ वर्षाचा अनुभव असावा.

कायदा क्षेत्रातील (LAW) अनुभव असलेल्यांना प्राधान्य देण्यात येईल.

**(२) रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळावर कार्यरत राहण्याची कालमर्यादा :-**

२.१. सदर मंडळाचे अध्यक्ष व अशासकीय सदस्य यांची नियुक्ती तीन वर्षासाठी करण्यात येईल.

२.२. मंडळावर अध्यक्ष व अशासकीय सदस्य म्हणून ३ वर्षासाठी नियुक्ती करण्यात आलेले व ३ वर्षाचा कालावधी पूर्ण केलेले सदस्य पुनर्नियुक्तीस पुढील किमान ३ वर्षासाठी पात्र होणार नाहीत. तथापि मंडळावर सदस्य म्हणून पद भुषविलेल्या व्यक्तीचा अध्यक्ष पदासाठी विचार करताना सदर अट लागू होणार नाही.

**(३) अशासकीय सदस्यांची संख्या :-**

राज्यातील प्रत्येक जिल्हयातील १ सदस्य तसेच मुंबई व पुणे या जिल्हयांतील प्रत्येकी कमाल ५ सदस्य, अशाप्रकारे सदस्य संख्या कमाल ४५ इतकी असेल.

**(४) रंगभूमी मंडळावर अध्यक्ष व अशासकीय सदस्य यांच्या निवडीसंदर्भात अनुसरावयाची कार्यपध्दत :-**

**४.१. अध्यक्ष व अशासकीय सदस्यांच्या निवडीची प्रकिया :-**

**४.१.१.** शासनाच्या मान्यतेने कार्यरत रंगभूमी मंडळाची मुदत संपण्यापूर्वी ४ महिने अगोदर रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळ कार्यालयाच्या, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दी करुन व प्रत्येक जिल्हयात प्रसिध्द होणा-या मराठी भाषेतील वृत्तपत्रात जाहिरातीव्दारे अर्ज मागविण्यात येतील. काही कारणास्तव ३ वर्षाचा कालावधी पूर्ण होण्यापूर्वी रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळातील अशासकीय अध्यक्ष व सदस्यांची नियुक्ती, शासनाने रद्द केल्यास १५ दिवसाची गुदत देऊन वरील प्रक्रीयेव्दारे अर्ज मागविण्यात येतील.

**४.१.२.** प्राप्त झालेल्या अर्जाची विहित नियम व अटीनुसार रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाकडून छाननी करुन अर्हता प्राप्त व्यक्तीची यादी तयार करण्यात येईल. प्राप्त झालेल्या अर्जाची विहित नियम व अटीनुसार रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाकडून छाननी करुन अर्हता प्राप्त व्यक्तीची यादी तयार करण्यात येईल. सदर यादीतून अध्यक्ष व अशासकीय सदस्य यांची मा.मंत्री (सांस्कृतिक कार्य) यांच्याकडे शिफारस करण्यासाठी पुढीलप्रमाणे समिती राहिल

| | | |
|---|---|---|
| १. | अध्यक्ष, अखिल भारतीय मराठी नाटय परिषद मुंबई | अशासकीय सदस्य |
| २. | नाटय व कला क्षेत्रातील तज्ञ व जेष्ठ रंगकर्मी | अशासकीय सदस्य |
| ३. | नाटय व कलाक्षेत्रातील तज्ञ व जेष्ठ रंगकर्मी | अशासकीय सदस्य |
| ४. | सचिव, रंगभूमी प्रयोग परिनिरिक्षण मंडळ, मुंबई. | सदस्य सचिव |

**४.१.३.** ही समिती रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाकडून प्राप्त यादीतून १०० व्यक्तींच्या मर्यादेत नावांची शिफारस करेल. सदर शिफारशीत नावांमधून मा. मंत्री(सांस्कृतिक कार्य) यांच्या स्तरावरुन कमाल ४५ व्यक्तींची अध्यक्ष व सदस्य पदासाठी निवड करण्यात येईल.

५. रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळावरील अध्यक्ष व अशासकीय सदस्यांना पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने दि. २७.११.२०१३ च्या शासन निर्णयानुसार निश्चित केलेले मासिक मानधन, बैठक भत्ता, प्रवास भत्ता, व दैनिक भत्ता तसेच अन्य अटी यामध्ये शासनाकडून सुधारणा केल्यास त्यानुसार लागू राहतील.

६. परिच्छेद क्र. ४.१.२ मध्ये नमुद केलेल्या समितीतील अशासकीय सदस्यांना बैठक भत्ता शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक बैठक २०१२/प्र.क्र.१/सेवा ५, दि. २४.५.२०१२ नुसार व प्रवास भत्ता व दैनिक भत्ता शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक प्रवास १०१०/प्र.क्र.२/सेवा ५,दि.३.३.२०१० मधील परिच्छेद १२ याप्रमाणे किंवा या भत्त्यांमध्ये शासनाकडून सुधारणा केल्यास त्यानुसार अनुज्ञेय राहिल.

७. सदर शासन निर्णय हा महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२२१०१३१६३२५८२४२३ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(विद्या वाघमारे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. मंत्री सांस्कृतिक कार्य यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई
२. सचिव, रंगभूमी प्रयोग परिनिरिक्षण मंडळ, मुंबई.
३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई
४. महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
६. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
७. निवड नस्ती (सां.का.१)

# अर्जाचा नमुना

रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळावर अध्यक्ष व अशासकीय सदस्यांची नियुक्ती साठी अर्ज.

**अर्जदाराचे अलीकडील काळातील छाया चित्र**

| | |
|---|---|
| अर्जदाराचे संपूर्ण नाव | |
| अर्जदार ज्या पदासाठी अर्ज करीत आहे. त्यापदाचे नाव. (लागू नसेल ते खोडावे) (दोनही पदांसाठी अर्ज करणा-या इच्छुक व्यक्तींनीं पदनिहाय स्वतंत्र अर्ज करणे बंधनकारक असेल.) | अध्यक्ष / सदस्य |
| जन्म तारीख | |
| संपूर्ण पत्ता | |
| दूरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक | |
| ईमेल आयडी | |
| शैक्षणिक अर्हता | |
| एखादया विषयाबाबत विशेष अभ्यास / नैपुण्य ( उदा. बौध्द व संत वाङःमय, ऐतिहासिक, सामाजिक, लोककला, साहित्य, बालनाटय, स्त्री चळवळ इत्यादी विषयाबाबत) असल्यास नमुद करणे. | |
| अवगत भाषा | |
| पदासाठी धारण केलेला अनुभव ( अनुभवासाठी स्वतंत्र टिपणी जोडावी.) | |

उपरोक्त पदाच्या नियुक्तीबाबतच्या अटी शर्ती व अर्हता मी काळजीपूर्वक वाचल्या असून त्या मला मान्य आहेत.

ठिकाण :-

दिनाक :-

अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी

महाराष्ट्र शासन
रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळ, मुंबई

दुरध्वनी क्र.०२२- ३५१०२८८५
Email. ID.-mumbairangbhumi@gmail.com

२ रा मजला ठाकरसी हाऊस, शुरजी
वल्लभदास मार्ग,बेलार्ड इस्टेट,मुंबई -४०० ००१

जा.क्र. रंप्रपम/आस्था/ १८४१ /२०२६ दिनांक :- ०१/०६/२०२६

## माहिती पत्रक

रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाच्या पुनर्रचनेसाठी अध्यक्ष व अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्यासाठी खालील अटी , शर्ती व अर्हताधारण करणा-या व्यक्तीकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

**१) अटी. व शर्ती :-**

१) रंगभूमी मंडळावरील अध्यक्ष व अशासकीय सदस्य यांची नियुक्ती पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग शासन निर्णय क्र. एसपीबी-२०२२/ प्र.क्र.-४४/ सां.का.१ दिनाक १३ ऑक्टोबर २०२२ मधील तरतुदीनुसार करण्यात येईल.(सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर शासन निर्णय या शिर्षकाखाली पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या अंतर्गत उपलब्ध आहे.)

२) रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळावर अध्यक्ष व अशासकीय सदस्यांची नियुक्ती ३ वर्षाच्या कालावधीसाठी करण्यात येईल. ३ वर्षाचा कालावधी पूर्ण होण्यापूर्वी सदर नियुक्ती रद्द करण्याचे अधिकार शासनास असतील.

३) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग शासन निर्णय क्र. एसपीबी-२०२२/ प्र.क्र.-१०४/ सां.का.१ दिंनाक ०८ मे २०२३ मधील तरतुदीनुसार ३ वर्षासाठी नियुक्ती करण्यात आलेल्या मंडळातील अशासकीय सदस्य आता पुनर्नियुक्तीस पुढील ३ वर्ष पात्र राहणार नाहीत. यास्तव त्यांचे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तथापि ते अध्यक्ष पदासाठी अर्ज करु शकतील.

४) अध्यक्ष व सदस्य या दोनही पदांसाठी अर्ज करणा-या इच्छुक व्यक्तींनी पदनिहाय स्वतंत्र अर्ज करणे बंधनकारक असेल.(दोनही पदांसाठी एकच अर्ज केल्यास तो विचारात घेतला जाणार नाही.)

**२) अर्हता:-**

रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळावर अध्यक्ष व अशासकीय सदस्य या पदावर नियुक्तीसाठी रंगभूमीशी संबंधित नाटय लेखन, नाटय व्यवस्थापन, नाटय निर्मिती, नाटय कलाकार, कोणत्याही विद्यापीठातील मराठी नाटयशास्त्र विषयाशी संबंधित प्राध्यापक, नाटय परिक्षक, साहित्यिक, तसेच प्रतिष्ठीत नाटय आणि एकांकिका स्पर्धा मध्ये तसेच रंगभूमीशी संबंधित महोत्सवामध्ये अविष्कार सिध्द केलेल्या व्यक्ती (कलाकार/ तंत्रज्ञ) इत्यादी क्षेत्रातील अनुभव.

अ) अध्यक्ष पदासाठी - किमान २० वर्षाचा अनुभव असावा.

ब) सदस्य पदासाठी - किमान १५ वर्षाचा अनुभव असावा.

कायदा क्षेत्रातील (LAW) अनुभव असलेल्यांना प्राधान्य देण्यात येईल.

३) इच्छुक व पात्र व्यक्तींनी उपरोक्त पदाकरीता अर्ज दिंनाक २०/०७/२०२६ सायंकाळी ६.१५ पर्यंत,**"सचिव" रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळ, २ रा मजला, ठाकरसी हाऊस, शुरजी वल्लभदास मार्ग, बेलार्ड ईस्टेट,फोर्ट, मुंबई –०१** या पत्यावर पोहचेल, अशा रितीने टपालाने पाठवावा. अथवा व्यक्तीशः आणून दयावा.

४) (Email व्दारे पाठविण्यात आलेले अर्ज विचारात घेण्यात येणार नाहीत.) **या संदर्भात अधिक माहितीसाठी ०२२-३५१०२८८५ या दूरध्वनीवर किंवा** mumbairangbhumi@gmail.com **या ईमेल वर संपर्क साधावा.**

५) विहित मुदतीच्या दिंनांका नंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा नियुक्तीसाठी विचार करण्यात येणार नाही.

६) उपरोक्त पदासाठी निश्चित करण्यात आलेली अर्हता व अनुभव नसलेल्या व्यक्तींच्या अर्जाचा नियुक्तीसाठी विचार करण्यात येणार नाही.